# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक १९

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **सोमवार दिनांक १४/०७/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ३. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ४. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ५. | श्री महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ६. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| ७. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ८. | श्री संजय मोरे | अधिक्षक आस्थापा विभाग |
| ९. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| ११. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १२. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १३. | श्री पी.डी. चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १४. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १५. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १६. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १७. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १८. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| १९. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २०. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| २२. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१६२ राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत जि. धुळे हद्दीत येणाऱ्या डेडरगाव तलाव,एम.आय.डी.सी. तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्या बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत जि. धुळे हददीत डेडरगाव तलाव, एमआयडीसी तलावांचे संवर्धन व सुशोभिकरण दोन प्रस्ताव तयार केले आहे. याकामी प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचा आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडील शासन निर्णय क्रं. रासयो २०२४/प्र.क्र.१/ आस्थापना-अ दि.२१ जुन २०२४ अन्वये सदरचा प्रस्ताव सादर करण्यासाठी स्थानिक संस्थेचा हिस्सा जमा करणेसाठी हमीपत्र सादर करावे लागणार आहे. तलाव संवर्धन पुर्ण झाल्यावर त्याची देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक संस्थेचा महासभा ठराव जोडणे आवश्यक आहे. याकरीता सदरचा विषय मे. महासभेपुढे ठेवण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करावा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६२ दिनांक १४/०७/२०२५**

राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत जि. धुळे हद्दीत येणाऱ्या डेडरगाव तलाव, एम.आय.डी.सी. तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करणे कामी संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव तयार करून सादर करणे बाबत कळविले आहे.

उक्त बाबत डेडरगाव तलाव, एम.आय.डी.सी. तलाव येथे Desilting व Dewatering करणे बाबत प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदर कमी एकूण रक्कम रु.१०.०० कोटी मात्रचा खर्च अपेक्षित आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागा कडील शासन निर्णय क्र. रासयो २०२४/ प्र.क्र. १ / आस्थापना- अ दि.२१ जून, २०२४ अन्वये तलाव संवर्धन पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल व दुरुस्ती करणे बाबत स्थानिक संस्थेचा ठराव जोडणे बाबत नमूद आहे.

उक्त बाबत दि.२१ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्थानिक संस्थेचा हिस्सा जमा करण्या बाबतचे हमीपत्र व देखभाल व दुरुस्ती करणे बाबत मे.महासभेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत जि. धुळे हद्दीत येणाऱ्या डेडरगाव तलाव व एम.आय.डी.सी. तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याकामी येणारा मनपा हिस्सा अदा करणेस तसेच देखभाल दुरुस्ती करणेचे हमीपत्र देणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६३ धुळे महानगरपालिका मूळ मंजूर विकास योजना सुधारित करणेसाठी इरादा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. नगररचनाकार धुळे मनपाची २०१८ मध्ये हददवाढ झाली आहे. हददवाढीचा आराखडा व विकास योजना पब्लीश केली आहे. त्याचबरोबर शासनाचे पत्र दि.१५/१०/२०१८ निर्णयानुसार एखाद्या क्षेत्राची

हददवाढ झाली तर मुळ हददीचा विषय विकास आराखडा हददवाढीसह सुधारीत करणे आवश्यक होते. आता वाढीव हददीची विकास योजना पब्लीश झाली तरी आपण त्याच शासन निर्णयानुसार जीआयएस प्रणाली नुसार विकास योजना तयार करण्याचे नियोजीत केले आहे. त्याअनुषंगाने ELU व PLUसाठी टेंडर सुध्दा दिलेले आहे. मात्र महाराष्ट्र प्रादेशीक अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये विकास योजना सुधारीत करण्याची तरतुद आहे. त्या तरतुदीनुसार हददवाढीचा व मुळ हददीचा विकास योजना पब्लीश व सुधारीत करणेसाठी इरादा जाहीर करणे व नगररचना अधिकारी म्हणुन सहा. संचालक नगररचना शाखा कार्यालय, धुळे यांची नियुक्ती करणेचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आता इरादा जाहीर केल्यावर किती दिवसात करायचे

मा. नगररचनाकार — २ वर्षात करावयाचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — ते जे डीपी युनिटचे आधिचे काम करत होते ते कंटीन्यू राहिल. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६३ दिनांक १४/०७/२०२५**

शासनाचे पत्र क्र. १ दिनांक.१५/१०/२०१८ चे निर्णयानुसार विकास योजना सुधारित करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन समानता, सुलभता व अचूकता आणण्याचा दृष्टीकोनातुन भौगोलिक माहिती प्रणालीय संगणक प्रणालीचा वापर करुन तयार करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही प्रस्तावित केल्यास विकास योजना सुधारीत करणेचे दोन टप्प्यातील नियोजनाबाबत येणाऱ्या अडचणी निर्माण होणार नाहीत.

तसेच मुख्यत्वे करुन दोन्ही (मुळ व वाढ़िव) हद्दीतुन जाणाऱ्या रस्त्याचे नियोजन, तसेच विकास योजना प्रस्तावाचे नियोजन करतांना नियोजन प्राधिकरणांचा संपूर्ण हद्दीचा एकत्रित विचार होऊन नियोजन करण्यास अडचणी येउ नये या उद्देशाने नवीन वाढीव हद्दीचा नकाशा तयार करण्याचे काम प्रस्तावित असल्यामुळे त्यासोबत जुन्या मुळ हद्दीचा (मुळ हद्द व वाढीव हद्द) संबंधित दोन्ही भागांची एकत्रित विकास योजना तयार करणे शहराच्या नियोजनाच्या दृष्टीने योग्य योग्य आवश्यक आहे. तसेच धुळे महानगरपालिका धुळे क्षेत्राचा विकास योजना सुधारित करतांना मुळ हद्द व वाढीव हद्द अशा दोन्ही भागांची एकत्रित विकास योजना तयार करणे शहराच्या भविष्यातील नियोजनाच्या दृष्टीकोनातून आवश्यकआहे.

त्यामुळे धुळे शहर विकास योजना शासन निर्णय क्र. १०१२/५२३ (न) पुनर्बांधणी क्र. ६२/प्रा/क्र.१०६/१२/नवि-९ दि.२८/१२/२०१२ अन्वये भागशः मंजूर केली असून तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन निर्णय क्र.टीपीएस २०१२/५२६ (न) पुनर्बांधणी क्र.६२/प्रा.क्र.१०६/१२/नवि-९ दि.३ जुलै २०१५ मंजूर झालेले आहे. उक्त योजनेचे एकूण क्षेत्रफळ४६.४६ चौ.मी इतके आहे. मूळ मंजूर विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यास मंजुरी देण्याचा उद्देश घोषित करणे इ. बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम २१ अन्वये तरतूद नमूद केलेली आहे.तसेच उक्त अधिनियम कलम २३(१) अन्वये इरादा जाहीर करणे कलम २४ नुसार विकास योजना सुधारित करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणून सहायक संचालक नगररचना शाखा कार्यालय धुळे नियुक्ती करणेस मान्यता देणे योग्य राहील. त्यानुषंगाने

कार्यवाही करणे हि धोरणात्मक बाब असल्याने धोरणात्म्क निर्णयासाठी सदर विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम २३(१) अन्वये धुळे महानगरपालिका मूळ मंजूर विकास योजना सुधारित करणेसाठी इरादा जाहिर करणेस तसेच कलम २४ नुसार विकास योजना सुधारित करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणून सहायक संचालक नगररचना शाखा कार्यालय धुळे नियुक्ती करणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६४ राजमाता जिजाऊ माँसाहेब (मातृतिर्थ स्मारकासाठी) धुळे म.न.पा. मालकी हक्काची छत्रपती संभाजी महाराज उद्यान, पांझरा नदीकिनारी, देवपूर धुळे मधील जागा मिळणेबाबत आणि स्मारक उभारणेबाबत निर्णय घेणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता राजमाता जिजाऊ स्मारक समितीमार्फत नियोजित राजमाता जिजाऊ स्मारक बांधणे प्रस्तावित आहे. याकरीता जागा मागणी त्यांनी केली होती. मनपा मालकी हक्काच्या छत्रपती संभाजी महाराज उद्यान पांझरा नदीकिनारी आपण सुचीत केले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळयाची जेवढी जागा आहे. तेवढीच मोजुन द्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६४ दिनांक १४/०७/२०२५**

नियोजित राजमाता जिजाऊ माँसाहेब स्मारक समितीच्या माध्यमातुन म.न.पा. मालकी हक्काच्या छत्रपती संभाजी महाराज उद्यान, पांझरा नदीकिनारी, देवपूर धुळे येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब स्मारक उभारणेकरीता उक्त ठिकाणी जागा मिळणेबाबत तसेच प्रशासकिय स्तरावरुन अनेक विभागाच्या परवानग्या मिळवण्याकरीता स्मारक समिती पाठपुरावा करण्यास तयार असून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्यात आणि हिन्दवी राष्ट्र उभारण्यास राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे कार्य प्रेरणास्रोत आहे. त्यांचे कर्तुत्व, दातृत्व, नेतृत्व, मातृत्व हे संपूर्ण मानवी जिवनात अंगीकारण्यासाठी सदैव कर्तव्याची जाणीव करुन देणारे आहे. अशा महापराक्रमी राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे भव्य-दिव्य स्मारक धुळ्यात व्हावे. सर्वसामान्यांपासून आबालवृध्दांपर्यंत राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा आदर्श, विचार पोहचावे याच शुध्द आणि निर्मळ हेतुने राजमाता जिजाऊ माँसाहेब (मातृतिर्थ) स्मारक उभारण्यात समितीला स्वारस्य आहे. कृपया राजमाता जिजाऊ माँसाहेब (मातृतिर्थ) स्मारकाकरीता उक्त जागा देण्याबाबत नियोजित राजमाता जिजाऊ माँसाहेब स्मारक समितीमार्फत कळविण्यात आलेले आहे.

छत्रपती संभाजी महाराज उद्यान परिसरात लाल बहादूर शास्त्री पुतळा, छत्रपती संभाजी महाराज पुतळा अस्तित्वात आहेत. तसेच उर्वरित जागेत थोर पुरुषांच्या पुतळयांसाठी पुतळा पार्क म्हणून जागा विकसित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.छत्रपती संभाजी महाराज उद्यानाचे अंदाजित एकूण क्षेत्रफळ ४००० चौ.मी. आहे. सदर ठिकाणी राजमाता जिजाऊ (मातृतीर्थ) स्मारक उभारणेस समितीला स्वारस्य असून उक्त जागा देणेकामी मे.महासभेची

मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच सदर समितीस शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. यास्तव सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार राजमाता जिजाऊ माँसाहेब (मातृतिर्थ स्मारकासाठी) धुळे म.न.पा. मालकी हक्काची छत्रपती संभाजी महाराज उद्यान, पांझरा नदीकिनारी, देवपूर धुळे मधील छत्रपती संभाजी महाराज स्मारकालगतच्या उजवीकडील दक्षिण-पश्चीम भागातील क्षेत्र सुमारे ५०० चौ मी. जागा स्मारक उभारणे कामी नियोजित राजमाता जिजाऊ माँसाहेब स्मारक समितीला शासनाच्या मार्गदर्शक सूचनेच्या अटी व शर्ती नुसार व पूर्ततेच्या अधिन राहून देण्यास मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६५ शहर क्षयरोग दुरीकरण केंद्रातील कंत्राटी कर्मचारी कै शिवबा नारायण महाजन यांच्या निधनामुळे त्यांच्या पत्नी अर्जदार मनिषा महाजन यांना पतीच्या रिक्त जागेवर मानधन तत्वावर सामावून घेणेबाबत केलेल्या विनंती अर्जावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कार्यालयीन अधिक्षक क्षयरोग दुरीकरण केंद्रातील कंत्राटी कामगार श्री. शिवबा नारायण महाजन यांचे दि. १९/४/२०२४ रोजी निधन झाले. निधनानंतर त्यांची पत्नी नामे श्रीमती मनिषा महाजन यांनी सहानुभुतीपुर्वक अर्ज सादर करुन मानधन तत्वावर नोकरी मिळणेबाबत विनंती केली होती. त्यांच्या अर्जाचा विचार करुन आपण त्यांना महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहुन एकुण रु. १२०००/- मानधनावर ६ महिनेकरीता तात्पुरती नियुक्ती दिलेली आहे. त्यानंतर सदरचा विषय मे. महासभेपुढे कार्योत्तर मंजुरीकरीता सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक विषयाला मान्यता देण्यात येत आहे.पद भरण्याची प्रक्रिया होईपर्यंत यांना ठेवा. त्यांच्या रिक्त जागेवर पुन्हा ६ महिन्यांकरीता नियुक्ती द्यावी. एनयुएचएम मध्ये जे दोन रिक्त पदे आहे त्याची भरती प्रक्रिया सुरु करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६५ दिनांक १४/०७/२०२५**

श्रीमती मनिषा शिवबा महाजन, यांनी दि २४/१/२०२५ व २२/४/२०२५ रोजी विनंती अर्ज सादर करुन नमुद केले की, त्यांचे पती नामे श्री शिवबा नारायण महाजन हे एनटीईपी – एनएचएम अंतर्गत धुळे म.न.पा. अंतर्गत TBHV या पदावर दि. 11/07/2005 जा.क्र. जिक्षनिसो/टी बी एच व्ही/नेमणूक 1717/18/2005 जिल्हा क्षय नियंत्रण सोसायटी धुळे या आदेशान्वये 2005 पासून कार्यरत होते.

तसेच डॉ. जे. सी. पाटील यांनी राष्ट्रीय शहरी दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत शहर क्षयरोग दुरीकरण केंद्र धुळे मनपा धुळे येथे कै शिवबा नारायण महाजन कंत्राटी आस्थापनेवर कार्यरत होते. त्यांच्या अअर्जदार मनिषा महाजन यांनी पतीच्या रिक्त जागेवर सामावून घेणेबाबत विनंती केलेली आहे. तथापी एनटीईपी अंतर्गत कंत्राटी कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसास सामावून घेणेबाबत कुठल्याही प्रकारच्या मार्गदर्शक सुचना नसल्याबाबत अहवालात नमुद केलेले आहे.

तरी उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.अहवालानुसार श्री शिवबा नारायण महाजन, हे TBHV या पदावर दि. ११/७/२००५ पासून एनटीईपी – एनएचएम अंतर्गत मानधनावर धुळे म.न.पा. येथे क्षयरोग दुरीकरण कार्यालयात कार्यरत होते. त्यांचे अचानक दि १९/४/२०२४ रोजी हदय विकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. मानधनावरील त्यांची एकुण सेवा १८ वर्षा पेक्षा जास्त झालेली होती.

एनटीईपी – एनएचएम धुळे म.न.पा. अंतर्गत सुरु असलेले शहर क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत् वेळोवेळी झालेल्या तपासणी व कामकाजाबाबत धुळे महानगरपालिकेच्या शहर क्षयरोग दुरीकरण क्रार्यक्रमास गौरविणेत आलेले आहे. तसेच सदर कार्यालयास उत्कृष्ठ कामगिरी व शासनाकडून प्रशंसा मिळालेली आहे. श्री शिवबा नारायण महाजन, मानधनरावरील कर्मचारी यांचे अचानक निधन झाल्यामुळे त्यांच्या परिवाराचे उदरनिर्वाहसाठी नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांची पत्नी नामे श्रीमती मनिषा शिवबा महाजन यांनी संदर्भीय क्र १ अन्वये विनंती केलेली आहे. त्यांचे शिक्षण बी. ए. पदवी परिक्षा उत्तीर्ण आहेत.

सदर प्रकरणी मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या दालनामध्ये दि २२/४/२०२५ रोजी झालेल्या चर्चेनुसार श्रीमती मनिषा शिवबा महाजन यांच्या अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन परिवाराचे उदरनिर्वाह करण्याकरीता नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना एकत्रित मानधन रु. १२,०००/- मात्र नुसार ६ महिने कालावधीकरीता मानधन तत्वावर नियुक्ती देण्याबाबत धोरणात्मक निर्णय असल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर करणेस आदेशीत केले आहे. त्याअनुषंगाने श्रीमती मनिषा शिवबा महाजन यांना रु. १२,०००/- मात्र मानधन तत्वावर ६ महिने कालावधीकरीता शहर क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम येथे नियुक्ती जा क्र धुमपा आस्था १३५ दि ७/५/२०२५ अन्वये मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तरी कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार शहर क्षयरोग दुरीकरण केंद्रातील कंत्राटी कर्मचारी कै शिवबा नारायण महाजन यांच्या निधनामुळे त्यांच्या पत्नी अर्जदार मनिषा महाजन यांची मानधन तत्वावर झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती मनिषा महाजन यांना एकत्रित मानधन रु. १२,०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता तथा एन. यु. एच. एम. कार्यक्रम अंतर्गत पदभरती प्रक्रीया होईपावेतो मानधन तत्वावर फेरनियुक्ती करण्यास मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६६ धुळे महानगरपालिकेतील नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (Defined Contribution Pension Scheme D.C.P.S.) / राष्ट्रीय निवृत्ती वेतनप्रणाली (National Pension Scheme N.P.S.) अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवाकालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन आणि मृत्यूउपदान / रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान तसेच धुळे महानगरपालिका सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती उपदान मंजुर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. लेखा लिपीक शासन निर्णय दि.३१/३/२०२३ अन्वये दि.१/११/२००५ रोजी व त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली लागु असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबांना निवृत्तीवेतन अथवा रुग्णता सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय केले आहे. त्यानुसार सदर कुटुंब निवृत्ती वेतनधारकास व रुग्णता निवृत्ती वेतन धारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन / रुग्णता निवृत्ती वेतन लागु होईल. तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान करणेबाबत शासन आदेश आहे. उक्त शासन निर्णयाप्रमाणे धुळे मनपातील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना प्रणाली लागु असलेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार लाभ देणेबाबत विषय मे. महासभेपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात सन २००५ नंतरच्या सेवेत असतांना मृत्यु झालेले कर्मचारी आहेत का

मा. लेखा लिपीक एकुण १६ कर्मचारी आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांच्याबाबतीत काय केले आपण

मा. लेखा लिपीक त्यांना अजुन लाभ दिलेला नाही. हा ठराव झाल्यानंतर त्यांना लागु करणार आहोत.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांचे कॉन्ट्रीब्युशन जमा केले का.

मा. लेखा लिपीक मनपा जो हिस्सा असेल तो जमा करुन त्यांना निवृत्ती वेतन योजना लागु करायची.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे लागु झाल्यापासुन कर्मचाऱ्यांचे कॉन्ट्रीब्युशन कापुन घेतो का.

मा. लेखा लिपीक हो कपात करुन मनपाचा हिस्सा जमा करतो आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत कोणाची पेंन्डन्सी नाही ना?

मा. लेखा लिपीक १ ते दिड कोटीची पेंन्डन्सी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ते रेग्युलर ठेवा. प्राधान्याने पगाराचे जीएसटी कॉन्ट्रीब्युशन येते त्यातील ५० -५० लाख हे दीड कोटीचे ॲरिअर निवृत्त कर्मचाऱ्यांचे कंप्लीट करा व इतर कर्मचाऱ्यांचे ॲरिअर कंम्प्लीट करा. मयत कर्मचाऱ्यांचे लवकरात लवकर वर्कआऊट करावे. शासन गाईड लाईनप्रमाणे कर्मचाऱ्यांना लागु करावे. केडर मधील लोक येतील काही दिवसांनी मनपाचे केडर होईल. तेव्हा हे इश्यु मोठया प्रमाणावर येतील सन २००५ नंतर जे लागलेले लोक आहेत त्यांचे पण कॉन्ट्रीब्युशन भरायचे. या गोष्टी वेळेत पुर्ण झाल्या पाहिजे. शासनाकडुन नियुक्त झालेल्या लोकांचे वर्कआऊट झाले ते देखील पाहुन घ्यावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६६ दिनांक १४/०७/२०२५**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 31/10/2005 व दिनांक 27/08/2014 अन्वये दिनांक 01/11/2005 रोजी किवा त्यानंतर महाराष्ट्र राज्य शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनुक्रमे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली योजना लागु करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर धुळे महानगरपालिकेतील नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, 1984 व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत.

तद्नंतर केंद्र शासनाच्या Central Civil Services (Implementation of National Pension System) Rules, 2021 दिनांक 30/03/2021 अन्वये केंद्र/राज्य शासनाच्या सेवेतील नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली योजना

अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवेत कार्यरत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास कुटंब निवृत्तीवेतन अथवा रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय केले आहे.

तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्रमांक G.S.R.२२७ (E) दिनांक ३०/०३/२०२१ नुसार Central Civil Services (Payment of Gratuity (under National Pension System) Rules, २०२१ दिनांक २३/०९/२०२१ अन्वये केंद्र शासनाच्या सेवेतील राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली योजना अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवेत कार्यरत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला मृत्यू उपदान, रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान अनुज्ञेय केले आहे.

केंद्र शासनाची अधिसूचना, क्रमांक G.S.R. ६५८ (E) दिनांक २३/०१/२०२१ नुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर धुळे महानगरपालिका सेवेत नियुक्त झालेल्या होणाऱ्या व नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना / राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली योजना लागु असलेल्या कर्मचा-याचा, अ) सेवेत असतांना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्ती वेतन आणि मृत्यू उपदान, ब) रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान लागु करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कुटंब निवृत्ती वेतनधारकास व रुग्णता निवृत्ती वेतनधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन / रुग्णता निवृत्ती वेतन लागू होईल.क) तसेच धुळे महानगरपालिका सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान लागू करण्यात येत आहे. वरील आदेशानुसार प्रदान करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त उपदान व मृत्यु उपदानाच्या प्रयोजनार्थ सद्यः स्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील तरतुदी लागू राहतील.

त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिकेतील नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (Defined Contribution Pension Scheme D.C.P.S.) / राष्ट्रीय निवृत्ती वेतनप्रणाली (National Pension Scheme N.P.S.) अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवाकालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन आणि मृत्यूउपदान / रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान तसेच धुळे महानगरपालिका सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती उपदान अदा करण्यास मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६७ — स्थानिक स्वराज्य निवडणूक- २०२५ च्या अनुषंगाने सर्व कामांसाठी व वाढीव होणाऱ्या बाबींसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता — सार्वत्रिक निवडणुक आगामी काळात घेण्यात येणार आहे. मा. राज्य निवडणुक आयोगामार्फत आदेश आला आहे. त्यानुसार दि. २६ जुनन २०२५ अन्वये शहरातील मतदान केंद्रातील ज्या

आवश्यक सुविधा उपलब्ध करावयाच्या आहेत, त्यासाठी आदेश केला आहे. त्यानुसार केंद्रातील टेबल, खुर्ची, बेंच, लाईटींग, इन्व्हर्टर, बोर्ड, व्हिडीओ कॅमेरे, शुटींग, प्रिंटर,स्कॅनर, वेब कास्टींग,चहा,पाणी, भोजन, दुरुस्ती खर्च,वाहन खर्च,अधिकारी कर्मचारी मानधन, जनजागृतीसाठी बॅनर इ. कामे धुळे मनपास करावी लागणार आहे. त्याकरीता संभाव्य खर्चास मंजुरीसाठी मे. महासभेपुढे विषय सादर झाला आहे. तसेच मागील पंचवार्षिक मध्ये ४५० मतदान केंद्रे होती. यावेही मतदारांची संख्या वाढल्याने साधारणत: ९० ते १०० मतदान केंद्रे वाढण्याची शक्यता आहे. तरी संभाव्य खर्च जास्तीचा होणार आहे. सदर कामी निविदा देखील काढावी लागणार आहे. याकामी मे. महासभेपुढे सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक मागील निवडणुक व आताची निवडणुक फरक असणार आहे. मतदारांची संख्या १ लाखाने वाढली आहे. मागील वेळी 3 लाख 29 हजार मतदार होते आता जवळपास 4 लाख 30 हजाराच्या आसपास मतदार आहेत. त्यामुळेएका केंद्राला ८०० मतदार संख्या धरली तरी जवळ जवळ १४० ते १४८ मतदान केंद्रे वाढतील. जी अस्तित्वातील मतदान केंद्रे व नविन शाळा आहे त्या शाळांमधील केंद्रे प्रत्येक प्रभागनिहाय जास्तीची आयडेंटीफाय करावी लागेल. मतदान केंद्र वाढवण्यासाठी काय करावे लागेल याचा रिव्हयु घेवुन रिपोर्ट द्यावा. निम्मे निम्मे मतदान केंद्र, वॉर्ड वाटुन घेवुन आतापासुन कामाला लागावे लागेल. साधारणत: ६० दिवसानंतर आचारसंहिता लागेल. या सगळया तयारी झाल्या पाहिजे. प्रत्येक मतदान केंद्र निहाय रिपोर्ट द्यावे. इंजिनियर लोकांचे रिपोर्ट लागतील, इलेक्ट्रीक कामासाठी, पाणी पुरवठयासाठी येत्या ८ दिवसात रिपोर्ट सादर करावे. त्या हिशोबाने इस्टीमेशन करावे. इतर संस्थांच्या शाळा घेण्यास हरकत नाही पण प्रचार कार्यालय तेथेअसणार नाही याची दक्षता घेवुन रिपोर्ट द्यावे. या महिन्यात इन्फ्रास्ट्रक्चर सर्व तयारी करायची आहे. यात एकपण गोष्ट सुटता कामा नये. इलेक्शन कमिशनच्या टाईमलाईन फॉलो होतील याची दक्षता घ्यावी. येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देण्यात येत आहे.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६७ दिनांक १४/०७/२०२५**

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगररपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूक आगामी काळात घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीच्या पुर्वतयारीचा विभागनिहाय आढवा मा.राज्य निवडणूक आयोगामार्फत वेळोवेळी व्हिडिओ कॉन्फरन्वद्वारे घेणार येत आहे.

या अनुषंगाने मतदान केंद्र निश्चिती व राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक ती व्यवस्था करणे बाबत सूचित करण्यात आलेले आहे. यात संदर्भीय आदेशानुसार मतदान केंद्रावर टेबल , खुर्ची, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहण्याच्या जागेवर सावलीसाठी शेड्स ई. उपाययोजना , मतदान केंद्रात जाणे- येणेसाठी स्वतंत्र entry- exist असावे , अशी सोय नसेल तेथे बाबूंची किंवा दोरींची बॅरीकेटिंग करणे बाबत म.आयुक्त तथा प्रशासक , धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या मार्फत आदेश प्राप्त झालेले आहेत.

तसेच म.राज्य निवडणूक आयोग , महाराष्ट्र यांच्या कडील पत्र क्र. रानिअ/ मनपा- २०२५ / प्र.क्र. ३ / का- ५ दि.२६ जून, २०२५ अन्वये वीज पुरवठा , पिण्याच्या पाण्याची व्यवस्था , वृद्ध/ दिव्यांग मतदान केंद्रावर जाणे सुकर व्हावे म्हणून रॅम्पची सोय करणे , मतदान केंद्र परिसरात स्त्री- पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय , मतदार सहाय्य केंद्र स्थापित करणे , माहितीचे फलक ई. स्वरुपाची सोयी मतदान केंद्रावर पुरविणे बाबत आदेश आहेत.

सन २०१८ च्या सार्वजनिक निवडणुकी मध्ये मतदार संख्या व सन-२०२५ मध्ये होणाऱ्या निवडणुकीतील मतदार संख्येत वाढ झालेली आहे. यात मागील पंचवार्षिक निवडणुकीत एकूण ४५० मतदान केंद्र असून निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे अजून

आजतगायत ८० ते ९० मतदान केंद्र वाढणार आहेत. यातील प्रत्येक शाळा निहाय नवीन मतदार केंद्र निर्माण करावी लागतील व पूर्वीच्या मतदान केंद्राची दुरुस्ती, नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे मतदान केंद्रांवर मतदानाच्या दिवसापासून ते मतदानाच्या निकाला पावेतो सोई पुरविणे तसेच वाढीव मतदान केंद्र उभारणे कामी मतदान केंद्रांची दुरुस्ती करणे ई. अनुषंगिक सर्व कामांसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.महासभेच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार स्थानिक स्वराज्य निवडणूक- २०२५ च्या अनुषंगाने सर्व कामांसाठी व वाढीव होणाऱ्या सर्व बाबींसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याबाबत विभागाने सर्व बाबींचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील उचित प्रक्रीया व कार्यवाही तातडीने सुरु करावी. वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६८ — धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित आकृतीबंध मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कार्यालयीन अधिक्षक — धुळे मनपाचा आकृतीबंध दि. ४ मार्च २०१६ ला झाला आहे. त्यामुध्ये २२७४ पदे मंजुर आहेत. त्यानंतर ५/१/२०१८ मध्ये ११ गावांची हददवाढ झाली व ९ जुन २०२५ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधात २३०३ पदांची वाढ केली आहे. मागील पदे २२४ व २३०३ असे ४५२७ पदांचा प्रस्तावात आकृतीबंध सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आता सद्यस्थितीत कार्यरत कर्मचाऱ्यांना पगार करण्यासाठी पैसे नाहीत. आकृतीबंध जितका रिॲलिस्टीक राहील असे पहा. मनपात सेवनिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. वाढलेल्या सेवा व झालेली हददवाढपाहता ही पदे मंजुर करतांना त्याची आवश्यकता किती आहे हे तपासुन घ्यावे. तांत्रिक पदे व इतर पदे यात कशा समाविष्ट होतील यावर विचार करुन आकृतीबंध मंजुर करण्यास पाठविला पाहिजे. आकृतीबंध GAD पर्यंत जातो व पुन्हा त्याची छाननी होते. आपल्याकडुन जातांनाच फॉल्टी होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. सगळे विभाग प्रमुख, आस्थापना उपायुक्त, अति.आयुक्त, प्रत्येक विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केलेल्या पदांचा आढावा घ्यावा. त्याबाबत बैठक घ्यावी. त्यावर चर्चा करावी. पुन्हा नव्याने विषय सादर करावा. विभाग निहाय वाढवत असलेल्या पदेनिहाय प्रस्ताव सादर करावा. तोपावेतो सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६८ दिनांक १४/०७/२०२५**

शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता एकूण 2274 पदांचा आकृतीबंध मंजूर करुन दिलेला आहे. सदर आकृतीबंधानुसार धुळे महानगरपालिकेतील आजपावेतो कामकाज सुरु आहे. परंतु कालांतराने धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढते कामकाज, आवश्यक कर्मचारी यांची संख्या व नव्याने निर्माण होणारे विभाग याकरिता नव्याने कर्मचारी आवश्यक असल्याने सुधारित आकृतीबंध मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. करिता धुळे महानगरपालिकेतील संपूर्ण विभागाकरिता सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही इकडील कार्यालयाकडून प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व विभाग प्रमुख यांना धुळे महानगरपालिका आकृतीबंध, 2016 च्या अनुषंगाने त्यांच्या विभागाचा सुधारित आकृतीबंध करावयाच्या अनुषंगाने नविन आवश्यक पदे, नविन मंजूर करावयाची पदसंख्या इ. बाबत प्रस्तावित करण्याकरिता आस्थापना विभागाशी समन्वय साधून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

याबाबत झालेल्या चर्चेनुसार आस्थापना विभागाने पुनश्च सर्व विभागप्रमुखांशी संपर्क करुन खाते निहाय अत्यावश्यक पदांचा आढावा घ्यावा व या संदर्भातील परीपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या अभिप्रायासह पुनश्च सादर करावा तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१६९ धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित सेवाप्रवेश नियम मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कार्यालयीन अधिक्षक शासनाने धुळे मनपातील ११२ संवर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजुर केले आहे. त्यानंतर दि. १५/१२/२०२२ ला सेवाप्रवेश नियत केलेलो आहे. त्यात २६ संवर्गाचा समावेश आहे. आता नविन सेवाप्रवेश नियमावली सादर केली आहे. त्यात १८१ संवर्गांचा समावेश आहे. या अनुषंगाने धुळे मनपाच्या सेवाप्रवेश नियमावलीसाठी मंजुरीकरीता विषय मे. महासभेपुढे सादर केला आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक यातदेखील विभाग निहाय व पदेनिहाय प्रस्ताव सादर करावा. तोपावेतो सदरचा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६९ दिनांक १४/०७/२०२५**

शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता एकूण 112 पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर करुन दिलेला आहे.शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता एकूण 34 पदांचा सुधारित सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आलेला आहे. तसेच धुळे महानगरपालिका आकृतीबंध, 2016 नुसार धुळे महानगरपालिकेतील आजपावेतो कामकाज सुरु आहे. परंतु कालांतराने धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढते कामकाज, आवश्यक कर्मचारी यांची संख्या व नव्याने निर्माण होणारे विभाग याकरिता नव्याने कर्मचारी आवश्यक असल्याने सुधारित आकृतीबंध मंजूर घेणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

धुळे महानगरपालिका मुख्य सेवाप्रवेश नियम, 2016 मधील विहीत अर्हता सद्यस्थितील कालबाह्य व सध्याच्या मंजूर आकृतीबंधानुसार सुसंगत नाही. तसेच धुळे

महानगरपालिका सुधारित सेवाप्रवेश नियम, 2022 मध्ये एकूण 34 पदांचा सुधारित आकृतीबंध विहीत असून, त्यानुसार धुळे महानगरपालिका मुख्य सेवाप्रवेश नियम, 2016 व धुळे महानगरपालिका सुधारित सेवाप्रवेश नियम, 2022 व सध्या प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधानुसार सुसंगत व एकत्रित सेवाप्रवेश नियम विहीत करणे आवश्यक आहे. त्याअनुसार परिशिष्ट – 1 ते परिशिष्ट – 4 अन्वये सुधारित एकत्रित सेवाप्रवेश नियमांचा प्रारुप मसूदा तयार करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने सेवाप्रवेश नियमाच्या प्रारुप मसूद्यास आवश्यक सुधारणेसह मान्यता मिळणे तसेच सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 457 (3) अन्वये शासन मान्यतेस्तव सादर करणेकरिता सदरचा विषय मान्यतेसाठी मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

याबाबत झालेल्या चर्चेनुसार आस्थापना विभागाने पुनश्च सर्व विभागप्रमुखांशी संपर्क करुन खाते निहाय व पदनिहाय आढावा घ्यावा व या संदर्भातील परीपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या अभिप्रायासह पुनश्च सादर करावा तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**